ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १ ऑगस्ट, १९५१ अंक ३१

## विविध माहिती

**पांढऱ्या वाघाची किंमत**—रेवाच्या महाराजांनीं आपल्या शिकारखान्यांतील एक पांढरा वाघ लंडनच्या प्राणिसंग्रहालयाला विकत देऊं केला होता. ह्या वाघाची किंमत म्हणून राजेसाहेब १,१०,००० रुपये मागत आहेत. इतकी किंमत परवडत नसल्यामुळें लंडन, मँचेस्टर आणि न्यूयॉर्कच्या प्राणिसंग्रहालयांनीं तो घेण्याचें नाकारलें आहे. तथापि, एक अमेरिकन नागरिक तो घेण्यास तयार असल्याचें समजतें.

**भारताच्या पौंडी शिलकींत वाढ**—जून, १९५० अखेर भारताची इंग्लंडमध्यें जेवढी पौंडी गंगाजळी होती, त्यापेक्षा जून, १९५१ अखेर ती ३० कोटी रुपयांनीं अधिक आहे असें समजतें. हे आकडे अनुक्रमें ८२७·४० कोटी रुपये आणि ८५७·४१ कोटी रुपये असे आहेत. मार्च, १९५० अखेर भारताची गंगाजळी सर्वांत अधिक म्हणजे ८८४·१८ कोटी रुपयापर्यंत पोंचली होती.

**कातडी कामगारांच्या परिस्थितीची पहाणी**—संयुक्त प्रांत सरकारच्या इंडस्ट्रिअल हेल्थ ऑर्गनायझेशनतर्फे प्रांतांतील कातडी कामगारांच्या परिस्थितीची पहाणी करण्याचें काम सुरू करण्यांत आलें आहे. ह्या धंद्यांत काम करणाऱ्या कामगारांना कोणते रोग होतात त्यासंबंधींचा एक अहवाल सरकारला सादर करण्यांत येणार आहे. प्रांतांतील ह्या धंद्यांत सुमारें १,८०,००० कामगार काम करीत असून भारताच्या कातड्या-चामड्यांच्या निर्यातींत २५ टक्के भाग संयुक्त-प्रांताचा असतो.

**कांचेचा नवा कारखाना**—हिंदुस्थान-पिल्किंग्टन ह्या नांवानें एक नवीन कांचेचा कारखाना काढण्यांत आला आहे. पिल्किंग्टन ब्रदर्स ही ब्रिटनमधील कांचेची कंपनी आहे. भारतामधील ह्या कंपनीचें भांडवल १०० लाख रुपये असून त्यापैकीं ७० लाख रु. किंमतीचें भांडवल विक्रीस काढण्यांत आलें आहे. त्यापैकीं ५९ लाख कंपनीच्या संस्थापकांनींच घेतले असून उरलेले ११ लाख सार्वजनिक विक्रीसाठी ठेवण्यांत आलें आहे.

**मुलांसाठी खास हॉटेल**—अमेरिकेंत एका हवाशीर ठिकाणीं मुलांसाठी खास हॉटेल काढण्यांत आलें आहे. ह्या हॉटेलमध्यें ६ ते १२ वर्षेपर्यंतच्या मुलामुलींची जेवणाखाण्याची व रहाण्याची सोय करण्यांत आली आहे. त्यांचें हिंडणें-फिरणें आणि खेळ इत्यादींवर नजर ठेवण्याची व्यवस्थाहि करण्यांत आली आहे. मुलांचे आईबाप जवळच्याच एका हॉटेलांत उतरून स्वतंत्रपणें आराम करूं शकतात.

**अमेरिकन विद्यार्थ्यांची अभ्यास-भेट**—पेन्सिल्व्हानिआंतील एका कॉलेजचे २२ विद्यार्थी व प्राध्यापक सध्या भारतांत आले आहेत. भारताच्या प्रश्नांचा अभ्यास करणें आणि उभयता देशांच्या लोकांचा अधिक परस्पर-परिचय करून घेणें, असा ह्या भेटीचा उद्देश आहे. हे सर्व पाहुणे दिल्ली, आग्रा, बनारस व मुंबई ह्या शहरांतून हिंडणार आहेत.

**गहूं आणि तांदुळाबाबत संशोधन**—इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेतर्फे संशोधकांची एक परिषद कोइमतूर येथें ता. ३० जुलै रोजीं भरविण्यांत आली आहे. ह्या परिषदेंत गहूं व तांदूळ ह्यांच्या संशोधनाबद्दल विचार करण्यांत येत आहे. भारताचे अन्नमंत्री श्री. मुनशी ह्या कामीं लक्ष घालीत आहेत.

**स्वातंत्र्यदिनाचे दैनिक अंक**—येत्या १५ ऑगस्टला भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा होईल. त्याप्रसंगीं दैनिक वृत्तपत्रांना ४ जादा पानें काढण्याची परवानगी मध्यवर्ती सरकारनें दिली आहे. कागदाच्या तुटवड्यामुळें वृत्तपत्रांच्या पृष्ठांवर सध्यां बंधनें आहेत.

**सिंद्रीला खताचा कारखाना**—बिहार सरकारनें सिंद्री येथें सुपरफॉस्फेटचा एक कारखाना उभारण्यास मंजुरी दिली आहे. कारखाना उभा करण्यास ४२ लाख रुपये भांडवल लागेल. खताचें प्रत्यक्ष उत्पादन १९५२ अखेर होऊं लागेल. दरवर्षी सुमारें १५,००० टन सुपरफॉस्फेट तयार होईल असा अंदाज आहे. बिहारमधील जमिनींत फॉस्फरस कमी असल्यामुळें कारखान्यांत तयार होणाऱ्या सर्व खताचा खप प्रांतांतच होण्याची शक्यता आहे. भारतांत हें खत तयार करणारे १०-१२ कारखाने आहेत. त्या सर्वांचें मिळून उत्पादन ५१,००० टन आहे.

**कच्च्या मालासंबंधीची परिषद**—इंटर नॅशनल मटेरिअल्स कॉन्फरन्सनें गंधकाच्या कमिटीवर काम करण्यासाठी भारताला आमंत्रण दिलें होतें. भारतानें व जर्मनीनें आमंत्रण स्वीकारल्याचें नुकतेंच जाहीर करण्यांत आलें आहे. गंधक-कमिटीवर आतां १३ देशांचे प्रतिनिधी काम करीत आहेत.

**अमेरिकन प्राध्यापकाची भारताला भेट**—बिहारमधील प्रौढ-शिक्षण-व्यवस्थेचें निरीक्षण करण्यासाठी प्रो. कोप नांवाचे एक अमेरिकन प्राध्यापक लवकरच त्या प्रांतांत जाणार आहेत. शिक्षणदानाचें काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उच्च कार्यपद्धतीचें शिक्षणाहि ते देणार आहेत. प्रो. कोप ह्यांचा मुक्काम मुझफरपूर जिल्ह्यांतील तुर्की ह्या शिक्षण-केंद्रांत रहाणार आहे.

### ब्रिटनच्या परदेशीं व्यापाराची स्थिति

१९५१ सालाच्या पहिल्या सहा महिन्यांत ब्रिटननें १,२०,४५,००,००० पौंड किंमतीचा माल निर्यांत केला. १९५० सालीं ब्रिटनच्या निर्यातीची जी सरासरी पडली होती, तिच्यापेक्षा १९५१ सालामधील वरील काळाची सरासरी सुमारें १५ टक्क्यांनीं अधिक आहे. सध्या चालू असलेला शस्त्रास्त्रवाढीचा कार्यक्रम लक्षांत घेतला तरी निर्यातिच्या बाबतींत प्रगति झाली असें दिसून येतें. परंतु तरी सुद्धां ब्रिटनच्या आयात–निर्यात व्यापारांतील प्रतिकूल तफावत अधिकाधिक होत चालली आहे. त्यामुळें वरील प्रगतीला थोडेसें गालबोट लागल्यासारखें झालें आहे. मालाच्या वाढत्या किंमती हें एक कारण त्याला सांगतां येण्यासारखें आहे. परंतु तें कांहीं निर्णायक नाहीं. ब्रिटन जो माल निर्यात करते त्यांच्या किंमती १९५० सालांतील सरासरीपेक्षा सुमारे १८ टक्केच वाढल्या आहेत. आयात होणाऱ्या मालाच्या किंमती मात्र गेल्या वर्षीपेक्षा ४२ टक्क्यांनीं वाढल्या आहेत. सर्व जगभर जी चलनवाढ झाली आहे तिचा परिणाम आयात मालाच्या किंमतीवर झाला असावा. त्यामुळें ब्रिटनला १९५१ सालाच्या पहिल्या सहा महिन्यांत १९५० सालापेक्षा ४३ टक्के अधिक किंमतीच्या मालाची आयात करावी लागली. १९५१ सालीं आयात मालाच्या किंमती ३० टक्क्यांनीं वाढतील असा अंदाज करण्यांत आला होता. प्रत्यक्ष वाढ मात्र अधिक प्रमाणांत झाल्यामुळें ब्रिटनला परदेशीय हुंडणावळीची अनुकूल तफावत व्हावयास पाहिजे असेल तर निर्यातीच्या प्रमाणांत आणखी वाढ होणें आवश्यक आहे. अलीकडे कांहीं महिन्यांत आयात मालाच्या किंमती उतरण्याचीं चिन्हें दिसत आहेत. ब्रिटननें परदेशीय बाजारपेठांना भरपूर माल पुरविण्यासाठी आपलें उत्पादन आणखी वाढविलें तर परदेशी व्यापारांतील प्रतिकूल तफावत भरून काढण्यास मदत होईल. व्यापाराखेरीज आणखीहि एक साधन ब्रिटनच्या हातीं आहे. तें म्हणजे बोटींच्या वहातुकीसाठीं मिळणारें भाडें आणि विम्याच्या हप्त्यांचें उत्पन्न. सर्व बाबी लक्षांत घेतां ब्रिटनला व्यापारांतील प्रतिकूल तफावत भरून काढण्याचें कार्य करतां येणार नाहीं असें नाहीं. परंतु त्यासाठी अधिक उत्पादक कष्ट करावे लागतील.

---

### श्री. सोवनी यांचा वाढदिवस

सायन्सच्या सामानाचे कारखानदार श्री. एस. व्ही. सोवनी ह्यांचा ६१ वा वाढदिवस शनिवार, ता. २५ ऑगस्ट रोजीं मुंबई येथें साजरा होणार आहे. पूजा, पानसुपारी, सायंटिफिक व सा. ट्रेडर्स असोसिएशनची सभा, श्री. स. का. पाटील ह्यांच्या हस्तें बक्षीस–समारंभ, सं. भू. राम मराठे ह्यांचें गायन, इत्यादि कार्यक्रम आखण्यांत आला आहे.

---

### रेल्वे गेज बदलण्याचा आग्रह

रुमानियांतील रेल्वेचें स्टँडर्ड गेज आहे तें बदलून रशियांतील गेजप्रमाणें ब्रॉडगेज करावयास लावण्यासाठी रुमानियावर रशिया दडपण आणीत आहे. असें गेज बदललें, तर थेट युगोस्लाव सरहद्दीपर्यंत, गाड्या न बदलतां, रशियाच्या फौजा तडक जाऊं शकतील आणि रशियाकडे रुमानियाची जी निर्गत होते, तिचा वहातुक खर्च कमी होईल.

---

**पोस्टाचे शिक्के हिंदी भाषेंत**—मध्यवर्ती सरकारच्या दळणवळण खात्यानें एक हुकूम जारी करून, संयुक्त–प्रांत, बिहार, मध्यभारत, राजस्थान आणि पंजाब ह्या राज्यांतून पोस्टाचे शिक्के हिंदी भाषेंतून मारण्यांत यावेत असें सुचविल्याचें समजतें. शिक्क्यांत वापरण्यांत येणारी लिपि अर्थातच देवनागरी राहील.


फोन: ३४५१९ तार: SAHYOG

**दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.**

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन-
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें
सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती
आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व
कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि
कोळसा वगैरे.



**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठा.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १ ऑगस्ट, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## १९५०–५१ मधील हिंदचा परराष्ट्रीय व्यापार

एप्रिल १९४९ ते मार्च १९५० या वर्षांत हिंदला परराष्ट्रीय व्यापारांत ७५ कोटी रुपयांची तूट आली होती, परंतु अवमूल्यनाचा व नंतर कोरियन युद्धाचा परिणाम म्हणून एप्रिल १९५० ते मार्च १९५१ या वर्षी हिंदला परराष्ट्रीय व्यापारांत २१ कोटी रुपयांची अनुकूल तफावत उरली आहे. व्यापाराची परिस्थिति सुधारत आहे हें यावरून दिसून येतें. १९४९–५० या वर्षी हिंदची निर्गत ४८५ कोटी रुपयांची झाली, परंतु आयात मात्र ५६० कोटी, ५० लक्ष रुपयांची झाली. १९५०–५१ या वर्षी निर्गत सुमारें ५८७ कोटी रुपयांची होऊन आयात सुमारें ५६६ कोटी रुपयांची झाल्यामुळें व्यापारांत अनुकूल तफावत उरली.

व्यापाराच्या आंकड्यांचे पृथःकरण केलें असतां असें दिसतें कीं, ग्रेटब्रिटनकडून सर्वांत जास्त म्हणजे १२२ कोटी रुपये किंमतीची आयात झाली. त्यानंतर अमेरिकेकडून ११६ कोटी रुपये किंमतीची आयात झाली, इराणकडून सुमारें ३८ कोटी रुपये किंमतीची, ऑस्ट्रेलियाकडून ३३ कोटी, ४० लक्ष रुपये किंमतीची, केन्या व कॅनडा यांकडून प्रत्येकीं १८ कोटी रुपयांची व पश्चिम जर्मनी आणि जपान यांकडून प्रत्येकीं १० कोटी रुपये किंमतीची आयात झाली. आयातीच्या मालाच्या दृष्टीनें विचार करतां असें दिसतें कीं हिंदनें गेल्या वर्षी कच्च्या कापसाच्या व कॉटन वेस्टच्या आयातीवर १०० कोटी, ७६ लक्ष रुपये खर्च केले. नंतर ८४ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री आयात केली; धान्य व कणीक यांच्या आयातीवर ८० कोटी रुपये खर्च झाला. नुसत्या गव्हाचीच आयात ३७ कोटी रुपयांची झाली. ब्रह्मदेश व थायलंडमधून २२ कोटी रुपये किंमतीचा तांदूळ आयात झाला. सर्व प्रकारच्या तेलांच्या आयातीवर ५९ कोटी रुपये खर्च झाला. लोखंड व पोलाद या व्यतिरिक्त इतर धातूंच्या आयातीवर २८ कोटी रुपये खर्च झाला. वाहनांच्या आयातीवर २४ कोटी रुपये खर्च झाला, व औषधें, रासायनिक द्रव्यें इ.ची आयात १९ कोटी रुपये किंमतीची झाली.

हिंदच्या निर्गत मालाविषयीं असें दिसून येतें कीं, निर्गतीच्या बाबतींत पहिला नंबर कापड व सूत यांचा लागतो. ही निर्गत १३४ कोटी, ३० लक्ष रुपये किंमतीची झाली. सिंगापूर, ब्रह्मदेश व सीलोन येथें कापडाचा खप विशेष झाला. सुमारें ११४ कोटी रुपये किंमतीचा तागाचा माल निर्गत झाला. यापैकीं ३० कोटी रुपये किंमतीचा माल अमेरिकेनें खरेदी केला, व अर्जेंटिनाची खरेदी ९ कोटी रुपयांची झाली. नंतर ७८ कोटी रुपये किंमतीचा चहा निर्गत झाला. त्यापैकीं ग्रेटब्रिटनची खरेदी ४७ कोटी रुपये किंमतीची होती. हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत ग्रेटब्रिटन व अमेरिका हे दोन देश महत्त्वाचे आहेत. त्यांपैकीं अमेरिकेशीं व्यापार गेल्या नऊ वर्षांत विशेष वाढला आहे.

## कंपन्यांचा ताबा लबाड लोकांचे हातीं जाण्यास प्रतिबंध

### ऑर्डिनन्सनें कंपनी कायद्यांत दुरुस्ती

सुप्रतिष्ठित आणि विख्यात लिमिटेड कंपन्यांचा ताबा, केवळ स्वार्थसाधू व कंपन्यांच्या आणि पैसे गुंतविणारांच्या हिताकडे दुर्लक्ष करणाऱ्या लबाड लोकांच्या हातीं जाऊं नये, ह्यासाठीं हिंदी कंपनी कायदा दुरुस्त करणारा एक ऑर्डिनन्स भारताच्या प्रेसिडेंटनीं नुकताच काढला आहे. दीर्घकाळ परिश्रमपूर्वक जतन केलेली जिंदगी नवे व्यवस्थापक थोड्याच काळांत उडवून टाकतात, मॅनेजिंग एजन्सीचा अलावन्स वाढवून घेतात, आपल्या अननुभवी भाईबंदांना खरेदी–विक्रीचे एजंट भारी कमिशनवर नेमतात आणि कंपनीच्या कार्यक्षमतेकडे दुर्लक्ष होतें, अशीं कित्येक उदाहरणें घडून आलीं आहेत. कंपनी कायद्यामध्यें सुधारणा सुचविण्याचें काम एक तज्ज्ञ कमिटी सध्या करीत आहे. तिच्या सूचनांस अनुसरून लबाड व मतलबी लोकांना कंपन्यांत गोंधळ घालणें अशक्यप्राय करणाऱ्या दुरुस्त्या कंपनी कायद्यांत लवकरच होतील. त्यापूर्वीच चांगल्या व मोठ्या कंपन्यांवर ताबे मिळविण्याची धडपड सुरू झाली आहे. तिला तात्काळ आळा बसविणें, हा ऑर्डिनन्सचा उद्देश आहे.

अस्तित्वांत असलेल्या कोणत्याहि कंपनीतील निर्णायक अधिकारसूत्रें एका हातून दुसऱ्या हातीं जाण्यासाठीं मध्यवर्ती सरकारची आगाऊ मंजुरी ऑर्डिनन्सनें आवश्यक केली आहे. अशा अदलाबदलीच्या वेळीं नव्या किंवा जुन्या व्यवस्थापकांना जाचक अटी घालूं दिल्या जाणार नाहींत. डायरेक्टर्स किंवा मॅनेजिंग एजंटस ह्यांनीं कंपनीच्या कारभारांत गोंधळ माजविला, तर त्याबाबत योग्य ती उपाययोजना करण्याचा अधिकार कोर्टास देण्यांत आला आहे. कंपनींतील निर्णायक अधिकारसूत्रांच्या स्थित्यंतरास मध्यवर्ती सरकारची आगाऊ मंजुरी घेण्यांत आली नसेल, तर असें स्थित्यंतर बेकायदा होईल. ह्या संबधांत सरकारास सल्ला देण्यासाठीं मध्यवर्ती सरकारला तिघांचें एक कमिशन नेमण्याचा अधिकार ऑर्डिनन्सनें दिला आहे. ह्याप्रमाणें सरकारनें श्री. सी. एच. भाभा ह्यांच्या अध्यक्षतेखालीं कमिशनची नेमणूक जाहीर केली आहे. श्री. सुंदरेशन व श्री. डी. एल. मुजुमदार हेहि त्या कमिशनचे सभासद आहेत.

वास्तविक, मॅनेजिंग एजन्सीच्या खरेदी–विक्रीवर ह्यापूर्वीं केव्हांच नियंत्रण यावयास हवें होतें. युद्धसमाप्तीनंतर लागलीच लबाड लोकांनीं अनिष्ट दिशेनें कारवाया करण्यास प्रारंभ केलेला होता. जुलै १९४९ मध्यें, म्हणजे दोन वर्षांपूर्वीं, सध्याच्या ऑर्डिनन्सच्या स्वरूपाची तरतूद करण्याची आवश्यकता मुंबई स्टॉक एक्सचेंजनें प्रतिपादन केलेली होती. तथापि, आताचा ऑर्डिनन्स ह्यापुढील कारवाया तरी बंद पाडील, हें उघड आहे.

# इराणचें तेल तुटलें तर पुढें काय ?

इराणच्या सरकारनें अँग्लो-इराणिअन कंपनीचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविल्यापासून जगाच्या तेलाच्या पुरवठ्याचा प्रश्न महत्त्वाचा झाला आहे. त्यांतल्यात्यांत ब्रिटिश कॉमनवेल्थमधील राष्ट्रांच्या दृष्टीनें ह्या प्रश्नाचें स्वरूप अधिक महत्त्वाचें आहे. इराणमधून होऊं शकणारा तेलाचा पुरवठा दुर्लक्ष करण्यासारखा नाहीं हें तर खरेंच. १९५० मध्यें इराणमध्यें ३,२०,००,००० टन तेलाचें उत्पादन झालें. हें उत्पादन जगाच्या एकूण उत्पादनाच्या ६ टक्के आहे, असें असलें तरी इराणच्या तेलावांचून अगदीं अडेलच असें मात्र नाहीं. कारण, ब्रिटनची तेलाच्या पुरवठ्याचीं ठिकाणें जगभर पसरलेलीं आहेत. तेलाच्या पुरवठ्याचा विचार करतांना चार प्रमुख बाबींचा विचार करावा लागतो. (१) अशुद्ध तेलाचा पुरवठा (२) तेल शुद्ध करण्याचे कारखाने (३) तेलवाहू बोटी आणि (४) डॉलर्स उपलब्ध होण्याची शक्यता.

इराणचें तेल बंद झालें तरी ब्रिटनला सुमारें ६०,००,००० टन तेल पौंडी गटांतील देशांकडून तावडतोब मिळूं शकेल, आणि ८०,००,००० टन तेल ब्रिटन शुद्ध करूं शकेल. जगांतील तेलाच्या उत्पादनासंबंधीं अमेरिकेच्या शेल कंपनीनें नुकतीच कांहीं माहिती प्रसिद्ध केली आहे, ती अशी. १९५० सालीं तेलाच्या एकूण उत्पादनापैकीं ५४ टक्के उत्पादन अमेरिकेंत झालें. त्यांच्या खालोखाल उत्पादन द. अमेरिकेंतील व्हेनेझुएला ह्या देशांत झालें. तें सुमारें १३½ टक्के झालें. रशिआ आणि त्याच्या कक्षेंतील देश ह्यांचें उत्पादन जगांतील उत्पादनाच्या ७½ टक्के आहे. अमेरिकेंतील तेलाच्या कंपन्या व तेल उत्पन्न करणारे इतर देश आपलें उत्पादन वाढवूं लागले आहेत. मध्यपूर्वेतील इतर देशहि (म्हणजे इराण सोडून) आपले उत्पादन वाढवूं लागले आहेत. सौदी अरेबिआ, कुवाइट, इराक व कातर इत्यादि मध्यपूर्वेतील देशांतील तेलाचें उत्पादन मोठ्या प्रमाणांवर वाढूं लागलें आहे. त्यांतल्यात्यांत कुवाइटमधील उत्पादन फारच झपाट्यानें वाढत आहे. १९४६ सालीं ह्या देशांत १०,००,००० टन तेल उपसलें गेलें होतें. १९५० मधील उत्पादनाचा आंकडा १,७०,००,००० टन इतका वाढला आहे. इराण सोडल्यास मध्यपूर्वेतील इतर देशांनीं गेल्या वर्षी तेलाच्या एकूण उत्पादनापैकीं १० टक्के उत्पादन केलें. कुवाइटमधील कंपनी ब्रिटिश आणि अमेरिकन कंपन्यांच्या संयुक्त मालकीची आहे. अशुद्ध तेल शुद्ध करण्याचे कारखाने काढणें मात्र जरा अवघड आहे; पण अशक्य मात्र नाहीं. अबादान येथील कारखान्यांत दरवर्षी सुमारें २,५०,००,००० टन तेल शुद्ध केलें जातें. जगाच्या निरनिराळ्या भागांत तेल शुद्ध करण्याचे कारखाने काढण्यांत येत आहेत. खुद्द ब्रिटनमध्येंच सात कारखाने काढण्याचें काम चालूं आहे. तें पुरें झाल्यावर ब्रिटनमध्यें दरवर्षी २,४०,००,००० टन तेल शुद्ध होऊं शकेल. युद्धापूर्वी ब्रिटनमध्यें दरवर्षी अवघे २०,००,००० टन तेल शुद्ध करण्याची व्यवस्था होती. त्याशिवाय अमेरिकेंत आणि युरोपमध्येंहि तेल शुद्ध करण्याच्या कारखान्यांचा विस्तार करण्यांत येत आहे.

तेलाच्या पुरवठ्याचीं केंद्रें दूर दूर असल्यामुळें त्याच्या वहातुकीचा प्रश्न अधिक बिकट होईल. सध्यां जगांतील तेल वहातूक करणाऱ्या बोटींची शक्ति सुमारें २,९०,००,००० टन आहे. त्यापैकीं एकतृतीयांश बोटी ब्रिटिश व अमेरिकन आणि डच मालकीच्या अगर त्यांच्या नियंत्रणाखालीं आहेत. युद्धापूर्वी ब्रिटनजवळ तेल-वहातुकीच्या जितक्या बोटी होत्या त्यांच्यापेक्षां एकतृतीयांश अधिक बोटी आज ब्रिटनजवळ आहेत.: त्याशिवाय ब्रिटिश गोद्यांतून ९७ नव्या तेलवाहू बोटी बांधण्यांत येत आहेत. त्यांची शक्ति ११,५०,००० टनांपेक्षां अधिक होईल. पौंडी गटाच्या बाहेरच्या देशांतून तेल घ्यावयाचें झाल्यास ब्रिटनला त्याची किंमत डॉलर्समध्यें मोजावी लागेल हें उघड आहे. इराणचें तेल तुटल्यास ब्रिटनला बाहेरच्या तेलासाठी नक्की किती डॉलर्स द्यावे लागतील तें आजच निश्चितपणें सांगतां येण्यासारखें नाहीं. तथापि प्राथमिक अंदाजाप्रमाणें ब्रिटनला दरवर्षी ३० ते ४० कोटी डॉलर्स द्यावे लागतील. इराणमधील घडामोडींमुळें सध्यांच्या परिस्थितींत डॉलर्सच्या पुरवठ्यावर ताण पडेल हें खरें. परंतु ब्रिटनच्या ताब्यांतील तेलाचा पुरवठा जसजसा वाढूं लागेल, तसतसा हा ताण कमी होईल ह्यांत शंका नाहीं.

---

### सर्जननें फी किती व कशी घ्यावी ?

"मृत्यूला भिऊन रोगी जी रक्कम देण्याचें मान्य करतील, त्या मापानें डॉक्टरानें आपली फी आकारतां कामा नये. रोगमुक्त झालेला मनुष्य किती पैसे देण्यास तयार होईल, त्यावरच फी अवलंबून ठेवणें श्रेयस्कर होय." चवथ्या शतकांतच रोमन डॉक्टरांना राज्यकर्त्यांकडून हा इशारा मिळाला होता, तरी अद्याप सर्वच देशांतून डॉक्टरांच्या भरमसाट फीबद्दल वरचेवर तक्रार ऐकूं येते. रोग्याकडून जेवढी फी काढतां येईल, तेवढी काढण्याचा कांहीं डॉक्टरांचा प्रघात आजहि चालू आहेच. पेनसिल्व्हिया विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मेडिसिनचे मुख्य सर्जन आणि आतां अमेरिकन लष्करांतील ब्रिगेडिअर जनरल डॉ. रॅव्हदिन ह्यांनीं डॉक्टरी व्यवसायाचें पावित्र्य राखण्याचे दृष्टीनें खालील सहा सूचना केल्या आहेत:-

(१) शस्त्रक्रियेसाठीं भरमसाट फी मागूं नका.

(२) अनावश्यक शस्त्रक्रिया करूं नका. कित्येक वेळां केवळ मानसिक काळजीनें रोगाचीं चिन्हें निर्माण होतात आणि शस्त्रक्रियेची जरूरीच नसते. पोटाच्या शस्त्रक्रियांपैकीं ३७% शस्त्रक्रिया न केल्या तरी चालतात.

(३) फॅमिली डॉक्टर व सर्जन ह्यांनीं फी वांटून घेण्याचें थांबवावें. व्यापारांतील जे प्रघात आपण त्याज्य मानतों, ते डॉक्टरी व्यवसायांत समर्थनीय कसे ठरतील ?

(४) फॅमिली डॉक्टरकडूनच ऑपरेशन करून घेण्याची रोग्याची इच्छा असतांहि, रोग्याला न कळत डॉक्टरानें सर्जनकडून शस्त्रक्रिया करवून घ्यावयाची; सर्जननें कोणताहि निर्णय स्वतः न घेतां फीसाठीं सांगितल्याप्रमाणें आपला चाकू चालवावयाचा, हें अत्यंत अश्लाघ्य आहे.

(५) अनावश्यक असतांना रोग्यावर इतर डॉक्टरांचा सल्ला लादावयाचें, आणि ठराविक सल्लागारांकडून काम करून घेणें त्यास भाग पाडणें बंद पडलें पाहिजे.

(६) फक्त तज्ज्ञाकरवींच शस्त्रक्रिया करवून घेतली पाहिजे.

अगदीं अल्पसंख्याक सर्जन्सना हें सर्व लागू असलें, तरी त्यांच्या कृत्यांमुळें सबंध व्यवसायाविरुद्धच लोक बोलूं लागतात ह्या दृष्टीनें बहुसंख्याक सर्जन्सनीं व्यापक हिताच्या दृष्टीनें अयोग्य पद्धतींचा बीमोड केला पाहिजे, असें डॉ. रॅव्हदिन ह्यांनीं सुचविलें आहे.

## मोटारींच्या धंद्याबद्दल तज्ज्ञांच्या कमिटीच्या सूचना

मार्च १९४९ मध्यें मोटारच्या धंद्याचे कारखानदार व मध्यवर्ती सरकारचे प्रतिनिधी यांची एक परिषद, मोटारी बनविण्याच्या धंद्याची वाढ कशी व्हावी व पुढील पांच वर्षांत पूर्णपणें हिंदमध्यें तयार झालेली मोटार बाजारांत मांडली जावी या प्रश्नांची चर्चा करण्यासाठी भरली होती. परंतु या परिषदेंतून प्रत्यक्ष असें कांहीं निर्माण झालें नाहीं. पुढें, अलिकडे या धंद्यामध्यें उपस्थित झालेले प्रश्न कसे सोडवावे या बाबतींत सूचना करण्यासाठी सरकारनें एक तज्ज्ञांची कमिटी नेमली. या कमिटीनें मोटारींच्या सुट्या भागांच्या आयातीवरील जकातींचा प्रश्न विचारांत घेतला. या कमिटीनें प्रत्यक्ष कारखाने पाहून व माहिती गोळा करून आपला अहवाल प्रसिद्ध केला आहे व तो सरकारनें स्वीकारला आहे.

हिंदमध्यें मोटारींच्या धंद्याची वाढ दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत झाली. परंतु येथील कारखाने विशेषतः जोडकाम करतात, मोटारींचा धंदा अशा स्वरूपाचा आहे कीं निश्चित गिऱ्हाईक व यंत्रज्ञ वाकबगार कामगारांचा पुरवठा आणि विपुल भांडवल असल्याशिवाय हा धंदा यशस्वी होणार नाहीं व या धंद्याच्या बाबतींत अमेरिका, इंग्लंड इ. औद्योगिकदृष्ट्या पुढारलेल्या देशांकडून तीव्र स्पर्धा सुरू आहे. मोटार तयार करण्यासाठी अनेक सुटे भाग बनवावे लागतात. कांहीं भाग असे आहेत कीं ते अद्यापहि दोन तीन वर्षे हिंदमध्यें तयार केले जाणार नाहींत. अशा सुट्या भागांच्या आयातीवर ९० टक्के इतकी जबर आयात जकात आहे; ती ३० टक्के इतकी कमी करण्यांत यावी अशी तज्ज्ञांच्या कमिटीची मुख्य शिफारस आहे व सरकारनें तिला मान्यता दिली आहे. जर सुटे भाग देशांतच तयार होऊं लागले तर मात्र सरकारनें पुन्हां या भागांवर पूर्वीइतकीच जास्त जकात आकारावी. कमिटीचें असें मत आहे कीं हिंदमधील कारखान्यांची परिस्थिति मोटारींचे बहुतेक सर्व सुटे भाग देशांतच तयार करण्याला अनुकूल आहे. विशेष प्रकारचें पोलाद व पोलादाच्या कांबी, नॉन-फेरस धातु, चामड्याचें कापड इत्यादि आवश्यक मालाची आयात जरूर त्या प्रमाणांत करण्याची सरकारनें तरतूद करावी अशी कमिटीची सूचना आहे. हिंदमध्यें कांहीं लहान कारखानदार आहेत. त्यांनीं मालाच्या उत्पादनाच्या बाबतींत मोठ्या कारखान्यांशीं सहकार्य करावें आणि कारखानदारांनीं आवश्यक मालाची आयात करून त्याचा सांठा करून ठेवावा अशाहि तज्ज्ञांच्या कमिटीनें कारखानदारांना उद्देशून शिफारसी केल्या आहेत. रस्त्यांची वाढ व राहाणीच्या दर्जांत सुधारणा यांवर मोटारींचा खप अवलंबून आहे.

---

**ब्रिटनचा पहिला अणुबॉंब तयार झाला?**—ब्रिटननें आपला पहिला अणुबॉंब तयार करण्याच्या मार्गावर बरीच प्रगति केल्याची बातमी एका अमेरिकन वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आहे. सध्या अणुबॉंबचें प्रत्यक्ष उत्पादन फक्त अमेरिकेंत आणि रशिआंतच होऊं शकते. ब्रिटनला स्वतःचा अणुबॉंब तयार करण्यांत यश आलें तर ह्या विध्वंसक अस्त्राची गुरुकिल्ली तिसऱ्या एका राष्ट्राला सांपडली असें होईल. चालू वर्षांत केव्हांतरी ब्रिटन आपल्या अणुबॉंबची कसोटी पाहील, अशी वार्ता आहे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

ठेवी १ कोटीवर

हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.


**रशिआचा पंचवार्षिक कार्यक्रम**—रशिअन गण-राज्यांतील सर्वांत मोठें राज्य रशिअन फेडरेटेड रिपब्लिक हें आहे. ह्या राज्यानें आपला स्वतःचा पंचवार्षिक कार्यक्रम अपेक्षेपेक्षाहि यशस्वी झाल्याचें जाहीर केलें आहे. १९४० सालापेक्षां १९५० मध्यें उत्पादन २१ टक्के अधिक करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें होतें. पण प्रत्यक्ष वाढ ३७ टक्के झाली. कापडाच्या धंद्यानें मात्र आपलें उत्पादन कार्यक्रमाप्रमाणें पुरें केलें नाहीं.

**रशिआंतील अन्न-कारखान्यांचें उत्पादन**—चालू वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत रशिआंतील अन्नाच्या कारखान्यांनीं आपलें उत्पादन ठरलेल्यापेक्षा ४·८ टक्क्यांनीं अधिक केलें, असें समजतें. गेल्या वर्षी ह्याच काळांत जितकें उत्पादन झालें होतें त्यापेक्षा चालू वर्षींचें उत्पादन बरेंच अधिक झाल्यामुळें रशिआंतील नागरिकांना खाण्यापिण्याचे पदार्थ मुबलक मिळूं लागले आहेत.

**लुधिआना येथें शेतकी कॉलेज**—लुधिआना येथें शेतकी कॉलेज काढण्यासाठी भारतीय सरकारनें ३० लाख रुपये मंजूर केले आहेत. पू. पंजाब सरकारहि कांहीं आर्थिक मदत करणार आहे. कॉलेजच्या उपयोगासाठी ५०० एकर जमीन कबजांत घेण्यांत आली आहे. भारताची फाळणी होण्यापूर्वी वरील संस्था ल्यालपूर येथें होती. ल्यालपूरचें कॉलेज भारतामधील एक उत्तम शेती संस्था म्हणून गणलें जात असे.

**ब्रिटनचें ब्रह्मदेशाला कर्ज**—बर्मा ऑइल कंपनीचे एक-तृतीयांश भाग विकत घेतां यावे म्हणून ब्रिटननें ब्रह्मदेशाच्या सरकारला ५० लाख पौंड कर्ज देण्याचें कबूल केलें आहे. ब्रह्मदेशांतील तेलाचें उत्पादन पुन्हां चालू करण्यासाठी ब्रिटन व ब्रह्मदेश मिळून प्रयत्न करणार आहेत. मध्य-ब्रह्मदेशांतील एका तेल-केंद्रांत तेल शुद्ध करण्याचा कारखानाहि उभारला गेला आहे.

**पूर्व जर्मनींत नवा रेल्वे रस्ता**—पूर्व जर्मनीच्या सरकारनें पश्चिम बर्लिनला वळसा घालून जाणारा एक रेल्वे-रस्ता बांधला आहे. प. बर्लिनमधलि सत्तेला वहातुकींत खंड पाडतां येऊं नये म्हणून वरील रेल्वे बांधण्यांत आली आहे. हा रस्ता २० मैल लांबीचा असून तो बांधण्यासाठी ५,००० मजुरांना ८ महिने खपावें लागलें.


ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवीवर दर साल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

## दि पूना मर्चंटस् को. बँक लि., पुणें.

चेअरमन : दा. वा. पोतदार, बी. ई. (मे.), बी. ई. (इले.) ए. एम. आय. ई.

ऑनररी एजंट . मो. वा. पेणकर एजंट : म. ग. सावणे

वरील बँकेच्या पटावर १०५१ सभासद असून त्यांनीं २,१५,७०० रु. चे भाग धारण केलेले आहेत. वसूल भांडवल १,२१,८०० रु. आहे. ठेवींमध्यें थोडी घट होऊन ३०-६-५१ अखेर ७,९८,७५९ रु. च्या ठेवी आहेत. ठेवींच्या दरांत वाढ केली त्यामुळें व्याज जास्त द्यावें लागलें. व्याज वाढवून हा वाढता खर्च भरून काढावा लागला. "जीवनावश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किंमतीमुळें गिऱ्हाइकांचा अभाव होऊन मालाचा उठाव होईना, अशी बिकट समस्या व्यापारी वर्गापुढें आहे आणि तिचा प्रतिकूल परिणाम सभासदांच्या परतफेडीच्या ऐपतीवर होऊन थकबाकी वाढली आहे." अहवालाचे वर्षी बँकेस ५,८२७ रु. नफा झाला. भागीदारांना ३½% डिव्हिडंड मिळणार आहे. वार्षिक सभा ता. १२ ऑगस्ट रोजीं आहे.

---

## श्री. डहाणूकर व काळे स्वदेशीं परतले

हिंद रेझर ॲण्ड ब्लेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दिनकरराव डहाणूकर व इंजिनियर श्री. कृ. ग. काळे हे नुकतेच आपल्या युरोपमधील दौऱ्यावरून परत आले. युरोपांतील निरनिराळ्या ठिकाणचे ब्लेड्सचे कारखाने स्वतःच्या नजरेखाली घालण्याच्या प्रमुख उद्देशानें ते युरोपला गेले होते.

---

## अमेरिकेंत संशोधनावरील प्रचंड खर्च

अमेरिकन सरकार आणि धंदेवाले, विज्ञान आणि संशोधन यांवर दरवर्षीं २०० कोटि डॉलर खर्च करतात. १९४० सालीं हा खर्च सुमारें ३४ कोटि, ५० लक्ष डॉलर होता.

---

**फ्रॅंकिंग मशीनचें राजचिन्ह बदला**—मोठमोठ्या व्यापारी कंपन्या पोष्टाकडे आधीं रकम भरून फ्रॅंकिंग मशीन वापरीत असतात. ह्या मशीनमध्यें तिकिटाच्या ऐवजीं जें राजचिन्ह उमटविण्यांत येतें तें ३१ ऑगस्टनंतर चालणार नाहीं असें भारतीय सरकारनें जाहीर केलें आहे. ज्या कंपन्या हें यंत्र वापरीत असतील त्यांनीं अशोक चक्राचें चिन्ह उमटविण्याची व्यवस्था करून घ्यावी असें सुचविण्यांत आलें आहे.

**माशांची किंमत चढली**—जासामधील नौगांग शहरांत सर्वच वस्तूंच्या किंमती वाढत चालल्या आहेत. माशांची किंमत दर शेराला १० रुपयांपर्यंत कडाडली आहे. तांदुळाची नियंत्रित किंमत दर मणामागें २० रुपये आहे. परंतु खुल्या बाजारांत तो ४० तें ४५ रुपये मण ह्या भावानें विकला जात आहे. कापड मिळणेंहि कठीण झालें आहे.

**अंदमानांत लाकडाचा धंदा**—अंदमान बेटांच्या समूहापैकीं दोन बेटें भारत सरकारनें कलकत्त्याच्या एका कंपनीला लांब भाडेपट्ट्यानें दिलीं आहेत. ह्या बेटांचें क्षेत्रफळ ७०० चौरस मैलांचें असून बेटांत उत्तम लाकूड सांपडतें. लांकडाच्या धंद्याचा विकास करण्यासाठीं सरकारनें कंपनीला परवाना दिला आहे. हा नवीन धंदा उभारण्याच्या कामीं एका जर्मन एंजिनिअराचें साहाय्य घेण्यांत आलें आहे.


दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)

पे-ऑफिस:—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. वी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

अधिकृत भांडवल रु. १५,४३,८१०

विक्री झालेलें भांडवल रु. ७,९३,८१०

वसूल भांडवल रु. ३,९९,३८५

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. वाळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रॅंच सेक्रेटरी.



## हिंदी सहकारी चळवळ वाजवी मर्यादेबाहेर जबाबदाऱ्या पत्करीत आहे काय ?

### श्री. सरय्या ह्यांचा ऑक्सफर्ड येथील परिषदेंत इषारा

ग्रेटब्रिटनमधील "फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन" प्रदर्शनाच्या अनुषंगानें शेतीविषयक सहकाराची एक कॉमनवेल्थ परिषद ब्रिटिश आइल्स फेडरेशन ऑफ ॲग्रिकल्चरल को-ऑपरेटिव्हजतर्फे ऑक्सफर्ड येथें २४, २५, २६ व २७ जुलै १९५१ ह्या दिवशीं भरविण्यांत आली होती. परिषदेचें स्वरूप चर्चात्मक होतें.

ऑक्सफर्ड येथील ह्या परिषदेस मुंबई प्रांतिक सहकारी बँकेच्या वतीनें जाण्यासाठी श्री. वाय. बी. गायतोंडे, बँकेचे मॅनेजर, ह्यांची योजना बँकेनें केली होती. त्यांनीं परिषदेंत बँकेचे चेअरमन, श्री. आर. जी. सरय्या ह्यांचा एक महत्त्वपूर्ण निबंध वाचून दाखविला.

"सहकारी चळवळीनें स्वतः जितकी साधनसंपत्ति जमविली आहे, त्यामानानें सरकारनें घेतलेली जबाबदारी अत्यल्प आहे," असें सांगून "सहकारी संघटनेनें आपलें सामर्थ्य वाढवावें आणि त्याबरोबरच सरकारी मदतहि ज्यास्त प्रमाणावर मिळावी; कारण, पतवाल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जें पुरविण्याची, नियंत्रित मालाचें सभासदांबरोबर बिगर-सभासदांसहि वाटप करण्याची, इत्यादि जबाबदारी सहकारी संघटनेनें पत्करली आहे, असें त्यांनीं प्रतिपादन केलें. सरकारी मदतीबरोबर सरकारी हस्तक्षेप आलाच, हें खरें असलें तरी सहकारी चळवळीच्या वाजवी कार्यक्षेत्रांत सरकारनें प्रवेश करून त्यास सरकारी कारभाराचा एक भाग बनवून टाकूं नये, अशी त्यांनीं सूचना केली.

### सरकारी हस्तक्षेप सहकाराचें वैशिष्ट्य नष्ट करील

सरकारी धोरणाची पूर्तता करण्यासाठी सहकारी चळवळीचा कितपत उपयोग करून घेता येणें शक्य आहे आणि सहकारी चळवळीच्या लोकशाही स्वरूपास बाध न आणतां आधुनिक लोकशाही राष्ट्रें सहकारी चळवळीस कशी व किती मदत करूं शकतील, हें स्पष्ट करून सांगणें हा श्री. सरय्या ह्यांच्या निबंधाचा मुख्य उद्देश होता. "सहकारी चळवळीस सरकारी खात्याचाच एक भाग बनवून टाकण्याच्या प्रयत्नांस चळवळीनें कसून विरोध केला पाहिजे, कारण सरकारी हस्तक्षेपाबरोबर निष्ठुर एकजातपणा, नव्या उपक्रमांस विरोध आणि अधिकारी वर्गाची हुकमत, हीं आलींच. सरकारी बंधनें टाळण्याचा उपाय, म्हणजे सहकारी कार्यकर्त्यांनीं चळवळीची वाढ करण्याची घाई न करणें आणि लायक मनुष्य व आर्थिक बळ ह्यांचे मर्यादेंतच चळवळ राखणें, हा होय. भारतांत सरकारपेक्षा जनतेनेंच सहकारी चळवळीच्या कार्यक्षेत्राची वाढ करण्याची आतुरता दाखविला आहे. त्यामुळें सहकारी चळवळीनें स्वतःच्या आवाक्याबाहेरहि कित्येक जबाबदाऱ्या पत्करल्या आहेत. त्यामुळें वाढत्या प्रमाणावर सरकारी मदत मिळण्याची मागणी निर्माण होऊन सरकारवरील अवलंबनहि वाढत आहे. सहकारी चळवळीनें आपलें क्षेत्र सभासदांपुरतेंच मर्यादित न करता सामान्य जनतेसहि त्याचा लाभ देण्यास तशी हरकत कांहीं नाहीं. परंतु, चळवळीचें स्वतंत्र वैशिष्ट्य आणि कार्यातील स्वातंत्र्य हीं अबाधित रहातील ह्याविषयीं दक्षता बाळगली पाहिजे." श्री. सरय्या ह्यांनीं वरीलप्रमाणें हिंदी सहकारी चळवळीस इषारा दिला आहे. येथील सहकारी चळवळ स्वतःला न पेलतील अशा जबाबदाऱ्या पत्करीत आहे; त्याला आवश्यक तें मनुष्यबळ व आर्थिक बळ चळवळीपाशीं नाहीं; सरकारी मदत त्यामुळें आवश्यक होऊन चळवळीचें सरकारी खात्यांत रूपांतर होण्याची पाळी यावयाची; तेव्हां सहकारी चळवळीनें आत्मनिरीक्षण करण्याची पाळी आली आहे, असें श्री. सरय्या ह्यांच्या निबंधाचें सार आहे.

## संग्रहालयांची शिक्षणविषयक कामगिरी

### संग्रहालय शिक्षण परिषदेंतील चर्चा

लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें, ह्या संस्थेनें ता. २० रोजीं संग्रहालय शिक्षण परिषदेचें दुसरें अधिवेशन भरविलें होतें. त्याचा मुख्य उद्देश येथील संग्रहालयाचा उपयोग पुणें शहरांतील शिक्षण संस्थांनीं अधिक प्रमाणांत कसा करावा आणि त्याच्या उपयुक्ततेचें कार्यक्षेत्र कसें वाढवावें, हा होता. परिषदेच्या वेळीं संग्रहालयाचे क्युरेटर श्री. भा. वि. खारपुरे ह्यांनीं निवेदन केलें, त्यांत ज्याप्रमाणें इंग्लंडमध्यें संग्रहालयांचेसाठी कायमचें रॉयल कमिशन आहे तशी मुंबई राज्यासाठीं एक समिति स्थापन करावयाचें अगत्य पुनः एकवार प्रतिपादन केलें. ते पुढें म्हणाले, "संग्रहालय, शाळा व वाचनालय ह्या तीन संस्था एकजीव करण्याचें कार्य म्युझियम आज करीत आहे. म्युझियम आर्थिक दृष्ट्या चिरस्थायी व्हावा, ह्यासाठी 'ग्रँट ॲक्ट' सारखी योजना आवश्यक आहे. म्युझियम एज्युकेशन असोसिएशन द्वारा शिक्षण संस्थांची व विद्यार्थ्यांची शिक्षण सेवा करावयास ग्रंथालय संस्था तयार आहे. संग्रहालयांच्या द्वारें शिक्षण, ह्याच एका कामावर ही संस्था आपलें सर्वस्व खर्च करीत आहे."

श्री. पु. ग. काशीकर ह्यांनीं तयार केलेल्या म्युझियमच्या कामगिरीच्या १८९० ते १९५० मुदतीच्या समालोचनावरून, संस्थेनें केलेल्या प्रगतीची व तिच्या गरजांची कल्पना येते. विशेषतः गेल्या २० वर्षांत संग्रहालयानें शिक्षणविषयक कामगिरी निश्चितपणें भरीव अशी केली असून स्वतःचें वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केलें आहे, हें स्पष्ट दिसून येतें. संग्रहालयाचा व्याप वाढत आहे आणि सध्यापेक्षा अधिक प्रमाणांत कायम स्वरूपाचें आर्थिक सहाय्य संस्थेस मिळेल, तर तिची सेवा करण्याची शक्तीहि पुष्कळच वाढेल त्यांत संशय नाहीं.

परिषदेचें उद्घाटन करतांना पंतप्रधान ना. खेर ह्यांनीं संग्रहालयांचें लोकशिक्षणाच्या दृष्टीनें असलेलें महत्त्व वर्णन केलें. म्युनिसिपालिट्या, लोकल बोर्डें, ग्रामपंचायती, इत्यादींना संग्रहालयांच्या बाबतींत आर्थिक जबाबदारीचा मोठा भाग उचलतां येणें कितपत शक्य आहे, ह्याचा तपशीलवार विचार परिषदेनें करावा व कर, ग्रँट इत्यादि विषयांबाबतहि तिनें सूचना कराव्यात, असें श्री. खेर ह्यांनीं सुचविलें. म्युझियम डेव्हलपमेंट कौन्सिल स्थापण्याबाबत किंवा संग्रहालयांसंबंधीं कायदा करण्यासाठी प्राथमिक विचारविनिमय होणें आवश्यक असल्याचें त्यांनीं सांगितलें.

**ग्रामपंचायतींना देणग्या**—उत्तर-प्रदेशांतील वारस नसलेल्या कांहीं लोकांनीं आपलीं घरें आणि शेतें आपल्या गांवाच्या ग्रामपंचायतिला वापरावयास दिलीं आहेत. ह्या बाबत योग्य ते कागदपत्रहि करण्यांत आलेले असल्यामुळें मिळकतींबद्दल कोर्टांत दावे होण्याचा प्रसंग येत नाहीं. ग्रामपंचायतींना अशा प्रकारें मालमत्ता मिळण्याचीं हीं उदाहरणें अनपेक्षित अशींच आहेत.

### संयुक्त–प्रांतांतील सहकारी संस्था

संयुक्त–प्रांताचे उद्योग आणि सहकार–खात्याचे मंत्रि श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं यू. पी. को-ऑपरेटिव्ह बँकेच्या बरेली येथील शाखेचें नुकतेंच उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं प्रांतांतील सहकारी चळवळींविषयीं त्यांनीं भाषण केलें. श्री. मालवीय म्हणाले:— "नवीन विकास योजनांच्या बाबतींत सहकारी तत्वांचें अवलंबन करण्यांत यावें असें सरकारचें धोरण आहे. पण प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र तें कृतींत उतरविण्याचा प्रयत्न केला जात नाहीं. गांधी–स्मारक फंडाची रक्कम सहकारी बँकांमार्फत वापरली जाईल असें वाटलें होतें; तसें झालेलें दिसून येत नाहीं." मध्यवर्ती आणि प्रांतिक सरकारांच्या खात्यांबद्दलचा अनुभवही फारसा उत्तेजनकारक नाहीं असें मत व्यक्त करून ते पुढें म्हणाले:—"सार्वजनिक पुढाऱ्यांची सहकाराबद्दलची कळकळ फक्त तोंडदेखलीच असते. सहकारी चळवळीला योग्य उत्तेजन देण्याची त्यांची तयारी दिसून येत नाहीं. सार्वजनिक पैसे वापरण्याची सध्यांची जी व्यवस्था आहे, तींत सहकारी बँकांना सध्यां मुळींच स्थान नाहीं. ग्रामीण जीवनाची पुनर्घटना करण्यांत सहकारी कार्यपद्धतीस खूप वाव आहे असें अघळपघळ पुष्कळच बोललें जातें. परतुं सध्यांची समाजव्यवस्था सहकारी बँकांना त्यांचें स्थान द्यावयास तयार नाहीं तोंपर्यंत असल्या बोलण्याचा कांहींहि उपयोग होणार नाहीं. खरा समाजवाद आणि आर्थिक विकेंद्रीकरण ह्यांच्याशिवाय सध्यां दुसरा मार्गच आपणापुढें नाहीं. सध्यां संयुक्त–प्रांतांत ३८,००० सहकारी संस्था कार्य करीत आहेत. त्यांच्या सभासदांची संख्या ११ लाखांवर आहे. सहकारी संस्थांत गुंतलेलें भांडवल सुमारें ७८ कोटी पेक्षांहि अधिक आहे. शेतीच्या मालाला संरक्षण मिळणें आवश्यक आहे. त्यासाठीं विविध–कार्यकारी संस्था काढणें जरूर आहे. ह्या संस्थांनीं मालाचें उत्पादनच करून न थांबतां वरकड मालाला बाजारपेठ मिळवून देण्याचें कार्यहि केलें पाहिजे. त्याशिवाय ग्राहकांना लागणाऱ्या वस्तूंचें वितरण, ग्रामोद्योग आणि पशु सुधारणा इत्यादि कामेंहि त्यांना करतां येण्यासारखी आहेत."

---

### सुपरवायझिंग यूनियनचें बँकिंग यूनियनमध्यें रूपांतर

(सटाणा ता. को. सु. यूनियनच्या रौप्यमहोत्सव प्रसंगीं, मॅ. डायरेक्टर श्री. द. अ. पाटील ह्यांनीं १-५-१९५१ रोजीं मांडलेले विचार.)

" आतां सुपरवायझिंग युनियन्स या संस्था अजागळप्रमाणें शिल्लक आहेत. जसें घर बांधून दिलें, थोडें बंगल्यासारखें आहे म्हणून त्यास बंगला म्हणा सांगितल्यावरून आम्हीं बंगला म्हणूं लागलों. पण त्यांत नांदण्यासाठीं आम्हीं जातो तर आम्हांला काडीमात्र सत्ता नाहीं. त्यामुळें आम्हांला रहाणीचें सुख कांहींच उपभोगतां येत नाहीं. म्हणजे नांव सोनुबाई व हातीं कथलाचा वाळा अशी स्थिति आहे. ही स्थिति आज लोकशाहीच्या स्वराज्यांत तरी आम्हांला कमीपणा आणणारी आहे. वास्तविक या संस्था म्हणजे लोकशाही शिक्षणाचे बाल वर्ग आहेत. दिवसोंदिवस लोक सुशिक्षित होत आहेत. त्यामुळें त्यांना जबाबदारीची व सत्तेची जाणीव होऊं लागली आहे. सत्तेच्या केंद्रीकरणाचे आतां दिवस नसून विकेंद्रीकरण हवें आहे. पण आमच्या सरकारचें इकडे लक्ष जाईल तो सुदिन. माझें व्यक्तिशः मत आहे कीं, यापुढें सुपरवायझिंग युनियनचें रूपांतर बँकिंग युनियनमध्यें झालें पाहिजे. हें म्हणणें आज पटणार नाहीं; तें कालांतरानें पटेल. बँकिंग युनियन्समुळें आमचा पैसा आमचेजवळ राहील. विनियोगाची सत्ता आम्ही वापरूं. त्याचे व्याजाचा ओघ बाहेर न जातां आमच्यांतच राहील. कर्ज वगैरे पुरेसें व वेळेवर मिळण्याचे बाबतींत आज जो चातकाप्रमाणें वाट पहावी लागते ती पाळी येणार नाहीं. सुपरव्हिजन व मार्केटिंग हीहि त्या संस्थेचीं उपांगे होतील. त्यायोगें तिन्ही बाबींचें सहकार्य व्यवस्थित होऊन शेतकऱ्यांचीं कामें चांगली होतील."

---

### " पतिव्रतेच्या पातिव्रत्याप्रमाणें सेक्रेटरीनें सोसायटी संभाळावी "

ता. १६-७-५१ रोजीं रात्रीं ९ वाजतां बँक इन्स्पेक्टर यांचे ऑफिसमध्यें पंढरपूर तालुका को. सोसायटी एम्प्लॉईज मित्रमंडळ सुखसंपत्ति संवर्धक सहकारी मंडळी लि., पंढरपूर या सोसायटीतर्फे चालविलेल्या व्याख्यानमालेचें द्वितीय पुष्प सोलापूर डि. सें. को. बँकेचे चेअरमन माननीय जी. डी. साठे यांनीं गुंफलें.

सुरवातीस सद्दर सोसायटीचे सेक्रेटरी श्री. भिंगे यांनीं सोसायटीच्या कार्याची माहिती सर्वांना दिली. त्यानंतर बँक इन्स्पेक्टर श्री. साळुंखे यांनीं निमंत्रित पाहुण्यांची सर्वांना ओळख करून दिल्यानंतर माननीय साठेसाहेब यांचें 'सहकारी चळवळींतील सेक्रेटरीचें स्थान' या विषयावर मार्गदर्शनपर भाषण झालें. ते म्हणाले, "आज पुष्कळशा सोसायट्या रेशनिंग वांटपाचें काम करीत आहेत. त्यामुळें त्यांना सहजरित्या व्यापारी अनुभव मिळालेला आहे. तोच उद्यां विनियंत्रणाच्या काळांत तग धरून राहण्यास उपयुक्त आहे. मात्र त्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. सोसायटीच्या कारभारांत सेक्रेटरीचें स्थान महत्त्वाचें आहे. सोसायटीची अब्रू त्याच्या हातांत असते. म्हणूनच त्यानें पतिव्रतेच्या पातिव्रत्याप्रमाणें सोसायटी संभाळली पाहिजे. सेक्रेटरीनें मुख्यतः प्रामाणिक राहिले पाहिजे. त्याच्या प्रामाणिकपणावर सोसायटीची भरभराट अवलंबून आहे. सहकारी चळवळीस अत्यंत महत्त्व आहे. तुमची आजच्यापेक्षां उद्यां जास्त गरज आहे. तरी आपण अधिकाधिक कार्यक्षम बना, प्रामाणिकपणानें वागा, कर्तबगारीनें वागा. या रीतीनें तुमच्या अपेक्षा तुम्हींच पूर्ण करून घ्याल. याप्रमाणें तुम्ही वागाल तर यश तुमचेंच आहे!"

---

### सटाणा येथील सेक्रेटरी ट्रे. क्लासचा समारोप

नाशिक जिल्ह्यासाठीं सटाणें येथें भरलेल्या सेक्रेटरीज ट्रेनिंग क्लासचा समारोप तारीख १८–७-१९५१ बुधवारीं दुपारीं ४-३० वाजतां श्री. प्रभु, डेप्युटी राजिस्ट्रार, को–ऑपरेटिव्ह सोसायटीज़, नाशिक, यांचे हस्तें, सटाणा येथें सटाणा तालुका डेव्हलपमेंट असोसिएशनच्या इमारतीच्या हॉलमध्यें करण्यांत आला.

प्रथम क्लासचे समारोपासंबंधीं प्रास्ताविक भाषण श्री. कुलकर्णी, को. ट्रे. इन्स्पेक्टर यांनीं केल्यानंतर श्री. दगाजी पाटील, श्री. गदगी आणि श्री. झोडगे यांचें भाषण झालें. अध्यक्षांनीं, सेक्रेटरी हाच सहकारी चळवळीचा खरा पाया आहे व त्याच्याच हातीं व प्रामाणिकपणावर सहकारी चळवळ व शेतकऱ्यांची उन्नति अवलंबून आहे, असें सांगितलें.

---

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.